<u>नियमित फौजदारी खटला क्र.१६१/२०२५</u>

<u>नि.क्र. ८</u>

## <u>दो षा रो प</u>

मी, **ए. एन. सरक, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, नेवासा, जि. अहमदनगर** खालीलप्रमाणे दोषारोप करीत आहे.

१. **ज्ञानेश्वर सोपान मुंगसे,**
वय – २५ वर्षे, व्यवसाय – शेती,

२. **नंदा सोपान मुंगसे,**
वय – ४७ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
दोघे रा. देडगाव, ता. नेवासा, जि. अहमदनगर.

<u>यांचेवर खाली नमुद केलेप्रमाणे आरोप ठेवते</u> –

१. दिनांक १४/०७/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजण्याच्या सुमारास, मौजे देडगाव ता. नेवासा, जि.अहमदनगर येथे फिर्यादी यांचे शेत बांधाजवळील रस्त्यावर तुम्ही आरोपी क्र.१ व २ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाकडी दांड्याने मारहाण करून फिर्यादीचा हात फ्रॅक्चर केला व त्यास इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचवली आणि तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३२६ सहवाचित कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला व सदर गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहे.

२. वरील दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही आरोपी १ व २ यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादीस लाकडी दांड्याने मारहाण करून इच्छापुर्वक इजा पोहोचवली आणि तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सहवाचित कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला व सदर गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहे.

३. वर नमुद ठिकाणी व वेळी आरोपी क्र.१ व २ यांनी आपसात संगनमताने फिर्यादी व साक्षीदार यांचा उद्देशपूर्वक शिवीगाळ करून अपमान करून त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा असा त्यामागे आरोपींचा उद्देश होता आणि तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहवाचित कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला व सदर गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहे.

**४.** वर नमुद ठिकाणी आरोपी क्र.१ व २ यांनी आपसात संगनमताने त्यांच्या उद्देशाच्या पूर्ततेकरीता फिर्यादी व साक्षीदार यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केला आणि तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहवाचित कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला व सदर गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रातील आहे.

आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, उपरोक्त आरोपांबाबत या न्यायालयाकडून तुमची न्यायचौकशी करणेत येत आहे.

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.03.09 17:50:54 +0530

दिनांक– ०९/०३/२०२६ (**श्रीमती ए. एन. सरक**)
नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा

आरोपीवरील दोषारोप तयार करण्यात आले व त्यांना त्यातील मजकुर त्यांच्या भाषेत समजावून सांगणेत आला.

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.03.09 17:50:50 +0530

दिनांक– ०९/०३/२०२६ (**श्रीमती ए. एन. सरक**)
नेवासा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३,
नेवासा